
REGISTERED No. B. 345

किर्लोस्कर
सेंट्रिफ्युगल पंप



किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवाडी

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।* —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १८ जानेवारी, १९५० | अंक ३

दी
## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे
सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा
पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची
जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

**स्थापनाः १९२६.**

मुख्य कचेरी :
**सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विकीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**
(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर
(४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी
(७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–
फोर्ट–(१०) मुंबई–मांडवी.

**—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—**
**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची
उत्तम व्यवस्था.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )

स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,६२,२५० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २९,३८,२०० |
| ठेवी | रु. ७,४७,०९,९०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,६३,००,००० |

प्रांतांतील बारा जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि
## प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
## बँक लि.
## ( शिड्यूल्ड बँक )
## प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विकीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१५,५२५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः–कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज
स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. डी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**प्राप्तीच्या करांतील मुंबई प्रांताचा वांटा**—प्राप्तीवरील कर आणि मध्यवर्ती सरकारचे इतर कर ह्यांपैकी प्रांतांना किती वांटा द्यावा ह्यासंबंधीं चौकशी करण्यासाठीं सर चिंतामण देशमुख ह्यांची नेमणूक झालेली आहे. प्रांतांना देण्यांत येणाऱ्या एकूण रकमेपैकीं २३ टक्के रक्कम आपणास मिळावी अशी मागणी मुंबई सरकारनें केल्याचें समजतें. सध्या मुंबई सरकारला प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाचा २१ टक्के भाग मिळतो.

**युनायटेड कमार्शिअल बँक लि.**—ह्या बँकेला १९४९ सालीं ३३,६०,५२३ रु. १३ आ. ९ पै. नफा झाला. त्यांत त्याच्या मागील वर्षांत झालेल्या नफ्याची रक्कम धरण्यांत आलेली आहे. ह्या नफ्याची विभागणी पुढील प्रमाणें सुचविण्यांत आली आहे. रिझर्व्ह फंडाला वर्ग केलेली रक्कम ७,५०,००० रु., नोकरवर्गाला बोनस ३,००,००० रु., करांची तरतूद १३,००,००० रु., शिल्लक १०,१०,५२३ रु. १३ आ. ९ पै. ह्या शिल्लकेपैकीं ७,००,००० रु. दर भागामागें १ रु. १२ आ. प्रमाणें भागीदारांना नफा म्हणून वांटण्यात येणार आहेत.

**स्वतःचा टेलिफोन घ्या**— प्रमुख शहरांतील लोकांनीं स्वतःच्या मालकीचा टेलिफोन घ्यावा म्हणून सरकारनें चालू केलेल्या मोहिमेला चांगला पाठिंबा मिळत आहे. ता. १ जानेवारीला ह्या मोहिमेला सुरवात झाली. तेव्हांपासून ९ जानेवारीपर्यंत संभाव्य ग्राहकांकडून ९० लाख रुपयांची अनामत रक्कम आली. मुंबई शहरांत टेलिफोनसाठीं सर्वांत अधिक अर्ज आले. तेथें अनामत रक्कम ५५,०२,८०० रु. जमा झाली. मद्रास शहरांत २२३ अर्ज आले आणि ४,६६,००० रु. अनामत रक्कम जमा झाली.

**पुणें जिल्ह्यांतील बंधारे**—पुणें जिल्ह्यांत येत्या मार्च अखेर ५० बंधारे पुरे करण्यांत येतील. ह्या बंधाऱ्यांच्या पाण्यासाठीं सुमारें ५ हजार एकर जमीन भिजेल. सर्व बंधाऱ्यांना मिळून १ लाख रुपये खर्च येणार आहे त्यापैकीं निम्मा खर्च मध्यवर्ती सरकार देणार आहे. पुणें जिल्ह्यांत खतासाठीं १२,७४० खड्डे खणण्यांत आले. त्यापैकीं ११,७९५ खड्ड्यांचा उपयोग प्रत्यक्ष खत निर्माण करण्यासाठीं करण्यांत आला.

**भूमिदारी हक्कासाठीं जमलेला फंड**—संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांकडून भूमिदारीचे हक्कासाठीं जमविण्यांत येणाऱ्या फंडाची रक्कम १२,६५,००,००० रुपये झाली आहे असें समजतें. आतांपर्यंत ११,३४,००० शेतकऱ्यांनीं आपल्या वांटणीच्या रकमा भरून भूमिदारीचे हक्क मिळविले आहेत.

**सेन-रॅले इंडस्ट्रीज ऑफ इंडिया लि.**—इंग्लंडमधील सुप्रसिद्ध रॅले इंडस्ट्रीज लि. ह्या सायकल तयार करणाऱ्या कंपनीच्या सहकार्यानें प. बंगालमध्यें वरील नांवाची कंपनी ३० जून १९४९ रोजीं स्थापन करण्यांत आली आहे. सायकली व तिचे सुटे भाग तयार करण्याचा कंपनीचा हेतु आहे. रॅले आणि सुधीर कुमार सेन ह्यांच्यांत झालेला करार वरील कंपनीनें ता. ७ सप्टेंबर १९४९ रोजीं स्वीकृत केला आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपयांचें आहे. त्यापैकीं ५०,००,००० रुपयांचें भांडवल विक्रीस काढण्यांत आलें आहे.

**इराणमध्यें अमेरिकेचे विमानतळ**—इराणमध्यें अमेरिकन सरकार १४ विमानतळ बांधीत आहे अगर त्यांची सुधारणा करीत आहे अशी बातमी आहे. इराण ओलांडून जाणाऱ्या रेल्वेवर ३० वर्षांसाठीं कांहीं हक्कसंबंध मिळविण्यासंबंधींही वाटाघाटी चालू आहेत.

**कच्च्या रेशमावरील आयात-जकात**—हिंदुस्थान सरकारनें कच्च्या रेशमाच्या आयातीवरील जकात नुकतीच कमी केली आहे ह्यासंबंधीं मत व्यक्त करतांना म्हैसूरचे मंत्री श्री. सुबराम चेटी म्हणाले कीं, सरकारनें घेतलेल्या निर्णयाचें मी स्वागत करतो. परंतु ह्याहीपेक्षां अधिक सवलतीचें धोरण सरकारनें स्वीकारलें असतें तर बरें झालें असतें. व्यक्तिशः मला असें वाटतें कीं, किंमतीच्या ३० टक्के आयात जकात योग्य आहे. आयात जकातीचा कमी केलेला ६ रुपयांचा दर लक्षांत घेऊन सुद्धा टॅरीफ बोर्डानें ठरविलेल्या किंमतीस कच्चें रेशीम विकणें कठीण जाईल.

**म्हैसूर संस्थानांत फिल्मचा धंदा**— म्हैसूर संस्थानांत कच्च्या फिल्मचा कारखाना काढण्याची खटपट चालू आहे. ह्या कारखान्यासंबंधीं एका स्विस कंपनीनें पुढाकार घेतला असून म्हैसूर सरकारनें सर्वतोपरी मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. कारखान्यासाठीं लागणाऱ्या विजेचा दर, त्यासाठी मिळवावयाची जमीन आणि इतर बाबींसंबंधीं म्हैसूरचें सरकार बारकाईनें विचार करीत आहे.

**कातड्याच्या वस्तूंची सहकारी संस्था**—आग्रा शहराच्या आसपास कातड्याच्या वस्तू तयार करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. फाळणी झाल्यावर कारखानदार आणि व्यापारी ह्यांच्यांतील दुवा असलेला मुसलमान दलालांचा वर्ग पाकिस्तानांत गेल्यामुळें ह्या धंद्याचा जम बराच विस्कटला होता. आतां ह्या धंद्याची सहकारी तत्त्वावर पुन्हा संघटना करण्यांत आली आहे. आग्रा येथील बाजारांत कारखानदार आणि व्यापारी ह्या दोघांनाही दुकानें देण्यांत आलीं आहेत.

**डबाबंद फळांचे कारखाने**—डबाबंद फळांचा धंदा साखरेच्या अत्यंत अपुऱ्या पुरवठ्यामुळें सध्या फार अडचणीच्या परिस्थितींत सांपडला आहे. प. बंगालमध्यें हा व्यवसाय करणाऱ्या ५६ कंपन्या आहेत. त्यापैकीं बहुतेक सर्व कंपन्या गेले कित्येक आठवडे जवळ जवळ बंद झाल्या आहेत. हिंदुस्थानांतील सर्वांत उत्कृष्ट आणि मोठा कारखाना प. बंगालमध्यें आहे. ह्या कारखान्याला दर आठवड्याला अवघी २ मण साखर देण्यांत येते. इतक्या अल्प पुरवठ्यावर कारखाना आठवड्यांतून जेमतेम तीन तासांपेक्षां अधिक चालूं शकत नाहीं ! ह्या धंद्यांत ५० लाख रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून १,५०० लोक त्यावर उपजीविकेसाठीं अवलंबून आहेत. पुरेशी साखर लवकर न मिळाल्यास हा धंदा बसेल अशीं लक्षणें दिसत आहेत.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता १८ जानेवारी, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भांडवल कसें मिळूं शकेल ?

### डॉ. राव यांचे कांहीं विचार

बनिसाव्या हिंदी आर्थिक परिषदेचें अधिवेशन डिसेंबर अखेर वॉल्टेर येथें दिल्ली विद्यापीठाचे डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. डॉ. राव यांनीं हिंदच्या आर्थिक परिस्थितीबद्दल, ती कशी सुधारावी याबद्दल व सरकारच्या आर्थिक धोरणाबद्दल विचार व्यक्त केले. त्यांनीं आपल्या भाषणांत सध्यां भासणारी भांडवलाची तूट कशी भरून निघेल याबद्दल मांडलेले विचार विशेष महत्त्वाचे आहेत.

भांडवलासाठीं हिंदनें विशेषत: देशांतच बचतीच्या रूपानें जो पैसा जमा होऊं शकेल त्यावरच भर द्यावा असें डॉ. राव यांचें मत आहे. यासाठीं प्रत्येकानें आपलें उत्पादन वाढवून, राहणीचा खर्च कमी करून शिल्लक टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ श्रीमंतांवरच या बाबतींत अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं. मजूर, शेतकरी वर्ग व इतर सामान्य नागरिक यांनीं शिल्लक टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आर्थिक जीवनाचें ध्येय साध्य करण्यापूर्वी हिंदची परिस्थिति विचारांत घेऊन व आंतरराष्ट्रीय संबंधांचा उपयोग करून शक्य होणाऱ्या गोष्टीहि विचारांत घेऊन वास्तववादी धोरण स्वीकारलें पाहिजे. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं परराष्ट्रीय भांडवलावरहि फारसें अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं; कांहीं निश्चित योजनांसाठीं परराष्ट्रीय भांडवलाची मदत मिळविण्यांत यावी व अशा भांडवलामुळें हिंदला आवश्यक अशी यांत्रिक व तांत्रिक मदत मिळूं शकत असेल तरच सरकारी भांडवलाशीं अशा परकी भांडवलाचें सहकार्य घडवून आणावें. परंतु केवळ साहसी दृष्टीनें गुंतविण्यासाठीं परराष्ट्रीय भांडवलांना निमंत्रण देण्यांत येऊं नये. कापड व ताग ह्या धंद्यांत सध्यां विशेष अडचणी आहेत. तेव्हां परदेशांतून कच्चा माल आयात करण्यापेक्षां देशांत उपलब्ध असणाऱ्या कच्च्या मालाचाच उपयोग करावा व यासाठीं उत्पादन थोडें मर्यादित करावें. कापडाचा उपयोग शक्य तितका काटकसरीनें करण्याकडे दृष्टि पाहिजे.

सरकारनें भांडवल उभारण्याबद्दल डॉ. राव यांचें मत असें कीं, विशिष्ट योजनांसाठीं भांडवल उभारण्यांत यावें. अशा भांडवलावर जरा ज्यास्त दरानें व्याज द्यावें. विशिष्ट योजनेसाठीं भांडवल उभारलें म्हणजे भांडवल देणारांनाहि आपल्या पैशाचा कशासाठीं उपयोग केला जातो हें निश्चित समजेल, व त्यामुळें विश्वास निर्माण होण्याला मदत होईल. असें भांडवल निरनिराळ्या प्रांतांतून जरूरीप्रमाणें उभारण्यांत यावें. अशा प्रकारच्या भांडवल-उभारणीच्या योजनेमुळें जनतेलाहि सरकारी कार्यक्रमाची प्रगति कशी काय होत आहे हें समजून आत्मीयतेची भावना निर्माण होईल. रशियामध्यें अशा प्रकारची कांहीं योजना आहे. सध्याच्या सरकारी कर्जाचें स्वरूप अगदीं सामान्य किंवा सर्वसाधारण असतें. लोकांना शिल्लक टाकावयास प्रवृत्त करण्यासाठीं लहानशा बचतीवरचाहि व्याजाचा दर आकर्षक असला पाहिजे. शक्य असेल तेथें सक्तीची बचत व कर लादणें याहि गोष्टी केल्या पाहिजेत.

सध्यां आपल्या देशाला दारिद्र्यानें पछाडलें आहे. हें दारिद्र्य दूर करण्याचा निश्चित मार्ग म्हणजे प्रत्येक माणसानें कार्यक्षमतेनें उत्पादनांत ज्यास्तींत ज्यास्त भर घातली पाहिजे, व साध्या रीतीनें जीवन जगलें पाहिजे. याच्या जोडीला सरकारकडून योजनाबद्ध व्यवहार आंखले गेले पाहिजेत म्हणजे प्रत्येकाला आपले प्रयत्न कोणत्या निश्चित कार्यासाठीं खर्ची पडत आहेत हें समजेल आणि त्यामुळें टिकाऊ योजना यशस्वी होऊं शकतील.

## हिंदी सिरॅमिक धंद्यापुढील प्रश्न

कुमारधवी फायरक्ले अँड सिलिका वर्क्स, बिहार, येथें भरलेल्या इंडिअन सिरॅमिक सोसायटीच्या १४ व्या वार्षिक सभेचे अध्यक्ष, श्री. आर. डी. चांदोरकर, (विजय ग्लास वर्क्स, मुंबई १०,) ह्यांचें अध्यक्षीय भाषण:—

“ सिरॅमिकच्या धंद्यास देशाच्या आर्थिक संसारांत महत्त्वाचें स्थान आहे; कारण हा धंदा केवळ त्याच्या गिऱ्हाइकांचीच गरज भागवितो असें नसून तो इतर कित्येक धंद्यांचीहि गरज भागवितो. म्हणून त्यास मूलग्राही धंदा म्हणणेंच योग्य होईल. ह्या धंद्याच्या उत्पादनाची जागतिक मागणी कांहीं काळ तरी कायम राहील. उत्पादकांनीं त्यासाठीं दूर दृष्टीनें आपला धंदा भक्कम पायावर उभारला पाहिजे. ह्या क्षेत्रांत नव्यानें येणारांस ही गोष्ट मला मुद्दाम पटवून द्यावयाची आहे. (१) उत्पादन खर्च कमी करून गिऱ्हाइकास माल स्वस्त देणें आणि (२) आपल्या मालाचा दर्जा सुधारणें ह्या दोन प्रश्नांचा आपण विचार केला पाहिजे. ह्यासाठीं शास्त्राचा प्रत्येक ठिकाणीं आपण उपयोग करून घेतला पाहिजे. शास्त्रीय प्रगति म्हटली म्हणजे ज्यास्त प्रयोगशाळा आल्या, संशोधन वाढलें आणि सिरॅमिक मालाचा उपयोग वाढलाच. इंडियन स्टँडर्डस इन्स्टिट्यूट मालामध्यें एकजातपणा आणण्याचा प्रयत्न करीत आहे, हें उत्तमच आहे. त्यास आपण हार्दिक मदत केली पाहिजे. ग्लास ॲण्ड सिरॅमिक्ससाठीं हिंदी सरकारनें जाधवपूर येथें एक मध्यवर्ती संशोधन केंद्र स्थापन केलें आहे. ह्या केंद्राकडे आपण आपल्या अडचणींची माहिती पाठवून तेथील संशोधनापासून फायदा करून घ्यावा. कच्च्या मालाच्या पुरवठ्याचे मानानें सध्यांचे हिंदी सिरॅमिक कारखाने फारच थोडे आहेत. त्यांत पुष्कळ वाढ होण्यास जागा आहे. उत्पादन खर्चावर सर्व कारखान्यांनीं लक्ष ठेवून त्यांत शक्य तेवढी कार्यक्षमता ठेवून काटकसर घडवून आणणें अगत्याचें आहे. ह्या प्रश्नाकडे लक्ष देण्याचें विशेष महत्त्व आहे. आपलें उत्पादन व उत्पादनशक्ति हीं वाढवावयाचीं असल्यास काम अधिक नेटानें व ज्यास्त वेळ करणें हा आपल्या सध्याच्या परिस्थितींत एकमेव उपाय आहे. त्यामुळें होणारा जादा नफा राष्ट्रीय सरकारनें मुख्यत: घेण्यास कांहीं हरकत नाहीं, त्याचा कांहीं योग्य भाग मात्र कारखाना व कामगार ह्यांस द्यावा. जादा सवलती आणि कमी काम, ह्याची प्रवृत्ति धंद्यास नाशक ठरणारी आहे.”

## १९५० च्या आर्थिक परिस्थितीबद्दल अंदाज

( लेखकः-मा. म. काळे. )

नवीन वर्षाच्या सुरवातीला चालू सालांतील आर्थिक परिस्थिती-बद्दल कोणतीं निश्चित लक्षणें दिसतात याचा विचार करणें उद्बोधक ठरेल. सुरवातीलाच डिसेंबर १९४९ अखेर शेअर बाजार किंचित् तेजींत होता, व ही तेजी जान्युवारी मध्येंहि चालू असून पुढेंहि चालू राहील असें दिसत आहे ही आशाजनक गोष्ट आहे. अर्थमंत्री डॉ. मथाई यांनीं डिसेंबरमध्यें कलकत्त्याच्या असोसिएटेड चेंबर ऑफ कॉमर्सपुढें केलेलें भाषण वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करणारें व बारकाईनें विचार करणाराच्या मनांत थोडासा आशावाद उत्पन्न करणारें ठरलें. शेअरबाजारावर व भांडवलदारांवर या भाषणाची थोडी तरी अनुकूल प्रतिक्रिया झाली. सप्टेंबरमध्यें रुपयाची किंमत उतरविण्यांत आल्यानंतर परिस्थिति बरीचशी बिघडेल, वस्तूंचे भाव कडाडतील असें वाटत होतें, ही भीति जवळ जवळ फोल ठरून ऑक्टोबर महिन्याचे निर्यात व आयात व्यापाराचे आकडे निःसंशय आशाजनक दिसतात. ऑक्टोबरमध्यें डॉलर देण्याकडे निर्यात रु. १०॥ कोटींची झाली, पूर्वीच्या महिन्यांत ती रु. ७·८ कोटी होती. अवमूल्यनामुळें निर्गत व्यापाराला चालना मिळाली आहे व आयातीचें धोरण सरकार अगदीं विचारपूर्वक ठरवीत असल्यामुळें यापुढें हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति सुधारेल असें लक्षण दिसत आहे. स्टर्लिंग कर्जांतून हातीं येणारी रक्कम व इतर उपलब्ध होणाऱ्या रकमा यांचा विनियोग करून व्या ारी देणें फेडतां येईल असें दिसत आहे. हिंद सरकारनें वास्तवतेवर भर देणारें आर्थिक धोरण स्वीकारलें आहे हें सरदार पटेल यांनीं औद्योगिक सल्लागार मंडळापुढें केलेल्या नोव्हेंबर महिन्यांतील भाषणावरून स्पष्टपणें दिसून येतें. सरकारी खर्चांत काटकसर, बचत, दीर्घकालीन योजना लांबणीवर टाकणें इ. मार्गाचा अवलंब करण्यांत आला आहे. पुढील वर्षाच्या सर्व अंदाजपत्रकांत जमाखर्चाची तोंडमिळवणी साध्य झाली आहे असें आढळून येईल. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे वस्तूंचे बाजारभाव वाढणार नाहींत या गोष्टीवर विशेष भर देण्यांत येऊन कांहीं बाबतींत बाजारभाव उतरविण्याचें धोरण निश्चितपणें दिसत आहे. तेव्हां यापुढें बाजारभाव निदान स्थिर तरी राहातील असें दिसतें.

मजूर व शेतावर काम करणारे लोक यांची परिस्थिति समाधानकारक दिसते. जमीनदारीच्या उच्चाटनामुळें व कुळ-कायद्यामुळें शेतकरी वर्गाची परिस्थिति निश्चितपणें सुधारेल. मजुरांच्या संपाचेंहि प्रमाण फारच कमी झालें आहे. भांडवलदार वर्गाला थोडी तरी आशा वाटूं लागली आहे व भांडवलदारांवर बसविण्यांत आलेले कर अंदाजपत्रकाच्या वेळीं थोड्या प्रमाणांत तरी कमी करण्यांत येतील असें मानावयास बरीच जागा आहे.

विधायक कार्यक्रमांच्या दृष्टीनें विचार केला असतां सिंधी कारखान्यांतील खतांचें उत्पादन व रेल्वे इंजिनांचा कारखाना याबाबतींत पुढील वर्षीं भरीव प्रगति होईल. पोलादाचाहि कारखाना सरकार काढणार आहे, व कारखान्यांची वाढ करण्यासाठीं दोन पोलादाच्या कंपन्यांना रु. ५ कोटी कर्ज सरकारनें मान्य केलें आहे. धान्याच्या बाबतींत १९५१ अखेरपर्यंत स्वयंपूर्ण होण्याचा कार्यक्रम व्यवहारांत उतरविला जात आहे. तागाच्या बाबतींतहि १९५२ अखेर पर्यंत वार्षिक ६० लक्ष गांठी उत्पादन करून हिंद स्वयंपूर्ण बनणार आहे. हा सर्व विधायक कार्यक्रम निःसंशय आशाजनक आहे. रेल्वेच्या वाहातुकीचीहि परिस्थिति सुधारली आहे.

येथपर्यंत आशाजनक बाबींचें वर्णन झालें. परंतु या चित्राला दुसरीहि बाजू आहे. इंग्लंड ज्याप्रमाणें महायुद्धानंतर प्रत्येक वर्षापुरेसा आर्थिक कार्यक्रम आखून तो यशस्वी करून दाखवितें त्याप्रमाणें हिंद सरकारनेंहि एका वर्षापुरेसा सर्व बाबतींतला निश्चित कार्यक्रम आंखणें आवश्यक आहे. साखर व कापड ह्या धंद्यांतील परिस्थिति बरीच बिघडली आहे व ती सुधारण्यावर सामान्य जनतेचें हित अवलंबून आहे. मजुरांची परिस्थिति सुधारत असली तरी त्या मानानें कोणत्याहि कारखान्यांत मजुरांची कार्यक्षमता वाढलेली नाहीं तर ती उलट कमीच झाली आहे असें अनेक कंपन्यांच्या वार्षिक सभांतील अध्यक्षीय भाषणांवरून दिसून येतें. तेव्हां या गोष्टीचा मजूर संघटनांनीं विचार करावा. जलवहातुकीच्या धंद्याची स्थिति विशेष चिंतनीय दिसते, व सरकारनें विशेष प्रकारें मदत केल्याशिवाय हा धंदा सुधारणार नाहीं. विजागापट्टम येथील जहाजें बांधण्याचा कारखाना थोडे दिवसांपूर्वीं बंद करण्याची पाळी आली होती. देशी कंपन्यांना परदेशी कंपन्यांची स्पर्धा विशेष मारक होते. जलवहातुकीच्या धंद्याचें अर्थव्यवस्थेंतील महत्त्व विचारांत घेतलें असतां सरकारनें निश्चितपणें कांहीं योजना आंखणें आवश्यक दिसतें. यंत्रसामुग्रीच्या उत्पादनाची परिस्थिति मुळींच सुधारलेली नाहीं असें मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स कॉर्पोरेशन लि. इ. कंपन्यांच्या अहवालावरून दिसून येतें, व झालेलें औद्योगीकरण पचनीं पाडण्यासाठीं ह्या धंद्याकडे विशेष लक्ष पुरविणें आवश्यक दिसतें. इतर बाबतींतहि म्हणजे कोळसा, कागद, सिमेंट इ. उत्पादन वाढविण्याची आवश्यकता आहे. सरकारनें खुल्या बाजारांत कर्ज उभारलें तर तें किती प्रमाणांत उभारलें जाईल हें सांगतां येत नाहीं. उद्योगधंद्यांकडेहि भांडवलाचा ओघ जोरदारपणें वळेल असें दिसत नाहीं. परदेशी भांडवलाबद्दलच्या वास्तववादी धोरणामुळें भांडवलदार, थोडेंबहुत भांडवल गुंतविण्यास तयार झाले असले तरी एकंदर नाजुक वातावरणामुळें अपेक्षेइतकें परदेशी भांडवल सहजासहजीं गुंतविलें जाईल असें दिसत नाहीं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उद्योगधंद्यांची संरक्षणाची मागणी विशेष नाजूक स्वरूपाची बनत चालली आहे, व सर्व परिस्थिति विचारांत घेऊन औद्योगिक संरक्षण कोणत्या प्रकारें द्यावें ह्या बिकट प्रश्नाचा विचार फिस्कल कमिशन करीत आहे. आयातीचें धोरण, निर्गतीचें धोरण, उत्पादनावरील जकात, आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेचें सभासदत्व, सेलस् टॅक्स, मजुरांच्या सुखसोई इ. मुळें अनेक बिकट प्रश्न उत्पन्न झाले असून हे प्रश्न सोडवितांना सामान्य जनता, कारखानदार व व्यापारी या सर्वांचें हित कसें साधावयाचें हा प्रश्न फार बिकट झाला आहे.

तरीहि सरकारनें वास्तववादी विधायक गोष्टींवर भर देणारें आर्थिक धोरण पूर्णपणें स्वीकारल्यास, परिस्थिति निश्चितपणें सुधारूं शकेल असें दिसतें. मूलोद्योग, शिक्षण व दारुबंदी ह्या योजना प्रांतिक सरकारांनीं लांबणीवर टाकल्यास परिस्थिति सुधारण्यास मदत होईल.

---

**त्रिपुराच्या महाराणीचा तनखा**—त्रिपुरा संस्थान विलीन करण्याचें ठरल्यामुळें, त्रिपुराच्या महाराणीला वार्षिक ३,३०,००० रुपये तनखा देण्याचें ठरलें आहे. हा तनखा करमाफ असून त्यांत महाराणींनीं आपला व आपल्या कुटुंबाचा खर्च भागवावयाचा आहे.

# इंटरनॅशनल बँकेचें हिंदुस्थानास कर्ज

## पूर्व चौकशी, तपासणी, अटी, देखरेख इ.

**बँकेचे अध्यक्ष, श्री. यूजिन आर. ब्लॅक, ह्यांचें ताजें भाषण**

भारत हा एक मोठा देश असून तो नुकताच स्वतंत्र झालेला आहे. त्याचेपुढें पुष्कळ मोठे प्रश्न ठाकून उभे आहेत, तरीपण त्याचें भवितव्य उज्वल होण्याची बरीच आशा आहे. भारताच्या उद्धारास हातभार लावण्याइतकीं महत्त्वाचीं व आव्हान देणारीं दुसरीं फारशीं कामें बँकेकडे येण्याचा संभव मला तरी दिसत नाहीं.

भारतांत नव्या प्रकारचे उद्योगधंदे नाहींत असें नाहीं; उदाहरणार्थ पोलादाचे कारखाने व कापडाच्या गिरण्या घ्या. त्यांचें उत्पादन मोठें असलें, तरी ३४ कोटी लोकांत तें वाटलें तर तें कितीसें भरणार? ह्यांपैकी बहुसंख्य लोक अद्याप जमिनीच्या लहान लहान तुकड्यांतच जुन्या-पुराण्या पद्धतीनें शेती करतात; त्यांना कसेंबसें जिवंत ठेवण्यापुरतें त्यांत उत्पादन होतें. कमी उत्पादन शक्तीच्या जमिनींवरील वाढत्या लोकसंख्येचा भार एकसारखा अधिकाधिक असह्य होत जातो, त्यामुळें हिंदी जनतेच्या रहाणीचें मान वाढविण्याचा प्रश्न ज्यास्तच बिकट झालेला आहे.

### हिंद सरकारपुढील अडचणी

ब्रिटिश गेल्यानंतर, हिंदी सरकारपुढे आणखीहि इतर तीव्र अडचणी होत्या. कारखाने व वहातुकीचीं साधनें ह्यांची झीज भरून काढावयाची होती आणि लोकांजवळ त्यांना खर्चतां येईल त्यापेक्षां ज्यास्त पैसा होता. नवी यंत्रसामुग्री व सुटे भाग ह्यांना फार मोठी मागणी होती. त्याशिवाय चलनाच्या वाढीमुळें चरितार्थाला लागणाऱ्या वस्तूंची मागणीही तुंबून राहिली होती. स्वातंत्र्याबरोबरच देशाची फाळणी झाली; लाखो निर्वासित हिंदुस्थानांत आले आणि लाखो परागंदा झाले. हैद्राबाद आणि काश्मीर प्रकरणामुळें सरकारला लष्करावरील खर्च कमी करतां येईना; त्यांतच लागोपाठ तीन वर्षांच्या अवर्षणाची भर पडली.

अशा अत्यंत अडचणीच्या परिस्थितींत हिंद सरकारनें दोन तांतडीच्या कामांकडे लक्ष पुरविण्याचें ठरविलें. त्यापैकीं वर्तमान कालाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें म्हटलें म्हणजे अन्नाच्या योग्य वाटणीचें होय. दुसरें काम म्हणजे देशाच्या आर्थिक विकासाचें होय. १९४८ च्या सप्टेंबर महिन्यांत हिंद सरकारनें आर्थिक सहाय्याविषयीं बँकेकडे विचारणा केली. बँकेनें हिंद सरकारकडे आर्थिक आणि द्रव्यविषयक निरनिराळ्या मुद्यांसंबंधीं एक तपशिलवार प्रश्नावलि धाडली. ह्या प्रश्नावलीला जें उत्तर देण्यांत आलें, त्याच्या योगानें बँकेला आपला प्राथमिक अहवाल तयार करण्यासाठीं जरूर असलेली माहिती मिळाली. ह्या अहवालांत हिंदुस्थानच्या आर्थिक व द्रव्यविषयक परिस्थितीची शक्य तितक्या सूक्ष्मपणें तपासणी करण्यांत आली. प्रत्यक्ष त्या देशांत जाऊन पहाणी करण्यापूर्वी, ज्या महत्त्वाच्या प्रश्नांची बँकेच्या प्रतिनिधींना कल्पना असणें अवश्य होतें, ते प्रश्न प्रामुख्यानें पुढें मांडणें येवढेंच वरील अहवालाचें कार्य होतें.

हिंदुस्थानचा अमेरिकेशीं आणि डॉलर्सच्या गटांतील राष्ट्रांशीं जो व्यापार चालतो त्यांत हिंदची निर्यातीपेक्षा आयात अधिक होते. १९४८ सालीं १६·३ कोटी डॉलर्सची आयात अधिक होती. युद्धापूर्वी ह्याच्या उलट परिस्थिति होती. हिंदुस्थानच्या युद्धोत्तर आर्थिक परिस्थितीचीं कारणें सहज समजण्यासारखीं आहेत. युद्धापूर्वी ब्रिटन, जर्मनी आणि जपान ह्या देशांकडून हिंदुस्थानची यांत्रिक साहित्याची आणि कच्च्या मालाची गरज भागविली जात असे. शेजारच्या ब्रह्मदेशाकडून हिंदुस्थानला तांदुळाचा मोठा पुरवठा होत असे. जपानचें आक्रमण आणि नंतरची यादवी, ह्यामुळें हिंदुस्थानचा तांदुळाचा पुरवठा बंद झाला. ब्रिटन, जर्मनी आणि जपान ह्यांच्याकडून मिळणाऱ्या मालाचा पुरवठा युद्धोत्तर कालांत बंद झाल्यामुळें हिंदुस्थानला अमेरिकेकडे वळावें लागणें अपरिहार्यच झालें.

फाळणीमुळें अन्नधान्याची टंचाई अधिकच वाढली. पूर्वी पाकिस्तानांतून हिंदुस्थानला धान्याचा पुरवठा होत असे. परंतु पाकिस्तानांतही अवर्षण झाल्यामुळें तेथें उत्पन्न झालेलें धान्य पाकिस्तानला स्वतःलाच लागलें. हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासाला रेल्वेच्या मार्गांची वाईट स्थिती हा एक अडथळा आहे. हिंदुस्थानांतील रेल्वेवरील सामुग्री जुनी झालेली आहे. युद्धाच्या वेळीं आणि त्यापूर्वी मंदीच्या काळांतही रेल्वे-रस्त्यांची नीट निगा राखली गेली नाहीं. त्यामुळें वहातूक अव्यवस्थित झाली. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या मालाचा वेळच्यावेळीं पुरवठा होईनासा झाला. उदा. मँगनीज. मँगेनीझच्या निर्यातीमुळें हिंदुस्थानला डॉलर्स मिळतात. परंतु रेल्वेच्या वहातुकीच्या अपुऱ्या सोईमुळें मँगेनीझची निर्यात व्हावी तितकी होऊं शकली नाहीं.

### अन्नधान्य आणि रेल्वे वहातुक

अन्नधान्याचें उत्पादन आणि रेल्वेची सुधारणा हे दोन प्रश्न हिंदच्या सरकारपुढें प्रामुख्यानें होते. देशांतील अर्थव्यवस्थेकडे लक्ष देणेंही जरूर होतें. चलनवृद्धीमुळें संपासारख्या घडामोडी होत होत्या. त्यामुळेंच सरकारला आपल्या औद्योगिक विकासाच्या योजना सुचिंतपणें अंमलांत आणतां येत नव्हत्या. लष्करी खर्चासाठीं कराचा बोजाही खूप वाढलेला होता. पैशाच्या बाजारांतही तंगी होती. सरकारच्या राष्ट्रीयीकरणाच्या धोरणासंबंधीं अनिश्चितता वाटत असल्यामुळें खाजगी भांडवलही पुढें येत नव्हतें.

अन्नधान्याचा प्रश्न हिंदुस्थान सरकार दोन मार्गांनीं सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. लागवडीखालीं असलेल्या जमिनींतून अधिक पीक काढणें आणि नवीन जमीन लागवडीखालीं आणणें, हे ते दोन मार्ग होत. हिंदुस्थानांतील जमिनींत दर एकरीं पीक फार कमी येतें. त्यासाठीं खतें आयात करण्याची कल्पना निघाली होती. ह्या खतांच्या आयातीसाठीं बँकेकडून कर्ज मिळविण्याचा बूट निघाला होता. परंतु खतें ही बाब दरवर्षी लागणारी असल्यामुळें दीर्घ मुदतीच्या खर्चासाठी ती योग्य नव्हे असें ठरविण्यांत आलें. उत्तर हिंदुस्थानांत ट्यूब विहिरी, खणून शेतीसाठीं पाणी पुरविण्याची एक योजना आहे. ह्या योजनेसाठीं बँकेनें कर्ज देण्यास फारशी हरकत नाहीं. ह्या योजनेसंबंधीं प्राथमिक चौकशी चालू झाली आहे. परंतु खर्चाचा अंदाज अद्याप मिळालेला नाहीं. तेव्हां ह्या योजनेच्या व्यवहार्यतेसंबंधीं अधिक माहिती हातीं येईपर्यंत त्या बँकेनें कर्जाचा विचार करूं नये असें ठरलें.

हिंदुस्थानांत अशी पुष्कळ जमीन आहे कीं जी पूर्वी लागवडीखालीं होती परंतु हल्लीं ती पडीक असून तींत 'कान्स' नांवाचे तण उगवलेलें आहे. हें तण उपटून काढणें बरेंच कठीण असतें.

हिंदुस्थानांत अमेरिकन लष्करानें जे यांत्रिक नांगर आणले होते त्यांच्या साह्यानें जमीन खोल नांगरून हें तण उपटून टाकण्याचे प्रयोग करण्यांत आले. हे प्रयोग समाधानकारक झाले आहेत. हिंदुस्थानांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याचा सर्वांत कमी खर्चाचा उपाय म्हणून बँकेला हा पटला. म्हणून ता. २९ सप्टेंबरला बँकेनें १ कोटी डॉलरचें कर्ज मंजूर केलें. नवीन जमीन लागवडीसाठीं तयार करण्याला लागणारे यांत्रिक नांगर आणि इतर अवजारें ह्या कर्जाचा उपयोग करून हिंद सरकारनें आयात करावयाचीं आहेत. हें कर्ज ७ वर्षें मुदतीचें आहे. व्याजाचा दर २॥ टक्के आहे. हिंदुस्थानांतील ३० लाख एकर पडीक जमीन नांगरावयाची व लागवडीखालीं आणावयाची झाल्यास त्याला ७ वर्षांचा काळ लागेल. तथापि ह्या काळांत हिंदुस्थानांत ३० लाख टन अधिक अन्नधान्याची निपज होऊं लागेल. ही निपज होऊं लागल्यावर मूळ कर्जाच्या कितीतरी पट अधिक डॉलर्स आज जे अन्नधान्याच्या आयातीवर खर्च होतात ते वांचतील.

आतां हिंदुस्थानांतील रेल्वेजचा अधिक विचार करूं. हिंदी रेल्वेजना एंजिनांचा पुरवठा कमी होता. एकूण एंजिनांपैकीं एक चतुर्थांश एंजिनें ४० वर्षांपेक्षांहि अधिक जुनीं होतीं. अमेरिकेंतून आणि कॅनडांतून ६५० रेल्वे एंजिनें आयात करण्यासाठीं बँकेनें कर्ज द्यावें असा सल्ला दिला गेला. त्यास अनुसरून १८ ऑगस्टला बँकेनें ३·४ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें. ह्या कर्जाची मुदत १५ वर्षांची असून व्याजाचा दर ३ टक्क्यांचा आहे. बंगालमधील दामोदर नदीवर धरण बांधण्याची योजना आणि पूर्व पंजाबांत दिल्लीपासून दोनशें मैलांवरील भाकरा धरणाची योजना ह्या बँकेपुढें मांडण्यांत आल्या होत्या. पैकीं पहिल्या योजनेचे हेतु शेतीसाठीं पाणी पुरविणें, पुरावर नियंत्रण ठेवणें आणि वीज उत्पादन करणें असे आहेत. दुसऱ्या योजनेचा मुख्य हेतु शेतीला पाणी पुरविणें हा आहे. दामोदर धरणाची योजना टप्याटप्यानें करतां येण्यासारखी आहे. ह्या योजनेपैकीं एका पोट धरणाच्या योजनेलाच २·५ कोटी डॉलर्स खर्च येईल. ह्या धरणासाठीं कर्ज देण्याचें बँकेनें कबूल केल्यास बँकेनें हिंदुस्थानला एकून ७ कोटी डॉलर्स कर्ज दिलें असें होईल.

### कर्ज देण्यांतील धोका बँकेनें पत्करला

परकीय भांडवल हिंदुस्थानांत गुंतविलें गेलें तर त्याचे फायदे काय आहेत, ते बँकेच्या प्रतिनिधि-मंडळानें हिंद सरकारला दाखवून दिले आहेत. हिंद सरकारलाही ह्या फायद्यांची जाणीव असून परदेशी भांडवलाला उत्तेजन देण्याचा त्या सरकारचा विचार आहे असें वाटतें. हिंदुस्थानांत नुकत्याच गुंतविलेल्या भांडवलावर विशेष जाचक बंधनें घालण्यांत आलेलीं नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थान लंडनमध्यें आपलीं परदेशी कर्जें उभारीत असे. १९३९ सालांत हिंदुस्थानला ३५ कोटी पौंडांचें कर्ज होतें. ह्या कर्जावरील व्याजाची व मुद्दलाची फेड हिंदुस्थान दरवर्षी सुमारें २·५ कोटि पौंड करीत असे. युद्धानंतर, हिंदुस्थाननें आपलें सर्व देणें फेडलें. आतां हिंदुस्थानचेंच इंग्लंडकडे ६० कोटी पौंड येणें आहे. ह्या गोष्टी विचारांत घेऊन दिलेल्या दोन कर्जांपेक्षां बरेंच अधिक कर्ज हिंदुस्थानला देण्यास हरकत नाहीं असा बँकेचा ग्रह झाला आहे. एखाद्या देशाला कर्ज दिलें म्हणजे हिशेबाच्या वह्यांत नोंद करून ही बँक स्वस्थ बसत नाहीं. ज्या कारणाकरितां कर्ज दिलें त्याकरतांच तें वापरलें जात आहे कीं नाहीं, ह्याची तपासणी बँक करते. मधून मधून हिंदुस्थानांत जाऊन कर्जाचा उपयोग कसा केला जात आहे ह्यावर नजर ठेवण्यांत येईल. आपण गुंतविलेलें भांडवल सुरक्षित रहावें असा हेतु अंशतः तरी बँकेचा असतोच, पण अंशतःच असतो, प्रमुख नसतो. कारण ही संस्थाच अशी आहे कीं तिच्या सभासदांना पैशाचा आणि सल्ल्याचा उपयोग व्हावा, हाच तिच्या स्थापनेचा हेतु आहे. हिंदुस्थानांत गुंतविलेलें भांडवल अगदीं पूर्णपणें सुरक्षित आहे, असें नाहीं. पण आजच्या जगांत तसें सुरक्षित काय आहे? हिंदुस्थानांत पैसे गुंतविणें म्हणजे साहस करण्यासारखें आहे असें मला वाटतें, परंतु त्यांतील धोका पत्करण्याजोगा खास आहे.

---

### दि महाराष्ट्र मेटल अँड जनरल मिल्स लि., सांगली

वरील कंपनीच्या कारखान्यांत तांबा व पितळ ह्या धातूंची उत्कृष्ट प्रतीची सर्कल्स व पत्रे (पाटे) तयार होतात. दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक ह्या विभागांतील नॉन फेरस मेटलचा हा प्रमुख कारखाना आहे. कंपनीची स्थापना २८ मे, १९४७ रोजीं झाली. ११ मे १९४८ पासून रसभट्टीचे कामास प्रारंभ होऊन जून १९४८ पासून रोलिंगचे कामास सुरवात झाली. ३० जून, १९४९ अखेरच्या दुसऱ्या वर्षी कंपनीनें ३,९६,९५८ रुपयांची विक्री करून ट्रेडिंग अकाउंटप्रमाणें ७१,०४६ रु. ठोक नफा मिळविला. १६,७१८ रु. घसारा काढून २१,८६० रु. नफा ताळेबंदाकडे नेला आणि मागील सालांच्या डिफर्ड रेव्हिन्यू खर्चाचे १२,८४० रु. वजा करून ९,०१५ रु. निव्वळ नफा दाखविला. त्यापैकीं १००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकले. ५% क्यु. प्रेफरन्स भागांवर दोन वर्षांसाठीं ५% करमाफ व ऑर्डिनरी भागांवर दोन वर्षांसाठीं ३% करमाफ डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें. चालू वर्षी कंपनीनें कारखान्याची वाढ करण्याचा कार्यक्रम हातीं घेतला आहे आणि त्यासाठीं उभारणी चालू आहे. कंपनीचे शेअर्स विक्रीवर अद्यापपर्यंत कांहींहि कमिशन अगर ब्रोकरेज देण्यांत आलेलें नाहीं आणि मॅनेजिंग एजंटस व डायरेक्टर्स ह्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक काम केलें आहे. श्री. बा. भु. पाटील, बी. ए., एलएल. बी., हे कंपनीचे चेअरमन असून दि युनियन एजन्सीजकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. तिचे वतीनें श्री. र. बा. रासने बी. ए., एलएल. बी. व श्री. बा. ना. गरगटे, बी. ए. एलएल. बी., हे डायरेक्टर बोर्डावर आहेत.

---

### पुणें सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें

पुणें सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. द. दि. चितळे हे त्यांच्या वयास ५५ वर्षें पूर्ण झाल्यानें बँकेच्या सेवेंतून दि. १०.१२.४९ पासून निवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचे स्नेही, चहाते व सहकारी कार्यकर्ते यांनीं दि. ८.१.५० रोजीं श्री. दा. वि. गोखले यांचे अध्यक्षतेखालीं बँकेचे इमारतींत सत्कार केला. त्यावेळीं श्री. एस. एल. आपटे, मो. ना. पाटसकर, डॉ. ढमढेरे, रा. जी. आर. तुळशीबागवाले, श्री. वा. चिं. भानु, वगैरे वक्त्यांनीं त्यांचेसंबंधीं गौरवपर भाषणें केलीं व त्यास श्री. चितळे यांनीं यथोचित उत्तरादाखल भाषण केलें. अध्यक्ष श्री. गोखले यांनीं आपल्या भाषणात श्री. चितळे हे अत्यंत उद्योगी, अभ्यासू व एकनिष्ठ आहेत व ते जरी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून निवृत्त होत असले तरी सहकारी क्षेत्रांत काम करीत राहतील अशी आशा प्रदर्शित केली.

सदर समारंभास पुणें शहरांतील व जिल्ह्यांतील सुमारें २०० गृहस्थ हजर होते.

## किरकोळ गोष्टींस महत्त्व आहे !

### टेलिफोनवरील बोलण्यांतील गोडी.

किरकोळ वाटणाऱ्या गोष्टी सुधारण्यासाठी प्रगतिमान पाश्चात्य राष्ट्रांतून कसा कसोशीनें प्रयत्न केला जातो, हें अवलोकन करून त्याचें अनुकरण करण्यासारखें आहे. टेलिफोनवरील बोलणें सुधारण्याचा प्रश्न घ्या. न्यूयॉर्कमधील एका हॉटेल कंपनीनें तिच्या नोकरांच्या टेलिफोनवरील बोलण्याच्या पद्धतींत सुधारणा घडवून आणण्याची फोन कंपनीस विनंति केली. हॉटेलमधील टेलिफोनवरील नोकर कारण नसता लाईन सोडून देत, मागितलेले नंबर मोठ्या नाखुषीनें देत, कारकून नीट उत्तरें देत नसत, रिसीव्हर धाडकन आपटून कॉल बंद केले जात. हॉटेलांतील पाहुण्यांचें बोलणें चालू असतांना त्यांत व्यत्यय येई. टेलिफोन कंपनीनें आपला मनुष्य पाठवून स्विचबोर्डाजवळ बसविला. त्यानें टेलिफोनवरील बोलणीं रेकॉर्ड केलीं, तीं हॉटेलमधील नोकरांना ऐकून दाखविण्यांत आलीं. टेलिफोनवर सौजन्यपूर्ण कसें बोलावें त्याचा चित्रपटहि दाखविण्यांत आला. गेल्यावर्षी अशा रीतीनें १७,५०,००० लोकांना टेलिफोन वापरण्याचें शिक्षण देण्यांत आलें. प्रत्येक नव्या नोकरास आतां टेलिफोनवर बोलण्याचें शिक्षण देण्यांत येतें. बेल टेलिफोन कंपनी ह्या बाबतींत करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती 'रीडर्स डायजेस्ट'च्या ताज्या अंकांत 'नेशन्स बिझिनेस' मधून उद्धृत करण्यांत आली आहे.

टेलिफोन ऑपरेटर्सची निवड करतांना सौंदर्य व चपळपणा ह्यांपेक्षा आवाजास जास्त महत्त्व दिलें जातें. अगत्य दाखविणारा आवाज हा हार्दिक हस्तांदोलनासारखा असतो. टेलिफोन कंपनी हा आवाज व बोलण्याची पद्धति सुधारण्यासाठी सर्व प्रकारें मदत करते; तिनें त्यासाठी शिक्षणक्रमच आंखलेला असतो. न्यूयॉर्कमधील एका मोठ्या स्टोअरनें टेलिफोन-ऑर्डर खात्याचें परीक्षण केलें तेव्हां कित्येक ऑपरेटर्सचा आवाज कंटाळवाणा आढळला, कित्येक जण दुसऱ्याचा निष्कारण खोळंबा करीत होते, मागितलेला जिन्नस दुकानांत शिल्लक नाहीं हें सांगतांना गिऱ्हाइकाच्या गैरसोईबद्दल माफी मागीत नसत. आतां त्या स्टोअरमधील ७०० नोकरांना टेलिफोनवरील बोलण्याचें शिक्षण देण्यांत आलें आहे. "रिसीव्हर धरून ठेवा" ऐवजीं ऑपरेटर आतां "जरा थांबतां का?" असें म्हणूं लागले आहेत. पुनः बोलणें सुरू करतांना एकदम दोन शब्दांत गिऱ्हाइकाची बोळवण न करतां, ते आतां "आपल्याला थांबावें लागलें, माफ करा हं" असें म्हणून बोलणें सुरू करतात. "मिस्टर क्ष हा विचारा" म्हणण्याऐवजी, "मिस्टर क्ष कडे तें खातें आहे. त्यांच्याकडे कनेक्शन देत आहे" असें म्हटलें जातें. कचेरींतील फोनची घंटा वाजूं लागली, म्हणजे "कोण आहे" असें न विचारतां, "कोण बोलत आहे म्हणून सांगूं?" असें अदबीनें विचारण्यास ऑपरेटर्सना शिकविलें जात आहे. तीन-चार शब्द त्यामुळें वाढले, तरी फोन करणारा त्यानें खूष होतो; त्याला महत्त्व दिलें जात आहे, असें त्यास वाटतें.

टेलिफोन करणारास त्याचा कॉल हा नेहमींच महत्त्वाचा वाटतो, ह्या दृष्टीनें त्याच्याशीं टेलिफोन कॉल घेणारानें वागलें पाहिजे. अमेरिकेंत प्रथम टेलिफोन ऑपरेटर म्हणून लहान पोरें काम करीत असत, परंतु त्यांची बोलण्याची पद्धति अत्यंत उपमर्दकारक असे. तेव्हां त्यांच्या जागीं मुली नेमण्यांत आल्या. १८९० च्या सुमारास दिवसाचे वेळीं सर्व ऑपरेटर्सची जागा मुलींनीं घेतली होती, आणि २० व्या शतकाचे प्रारंभीं त्या रात्रपाळीहि करूं लागल्या. अमेरिकेंत दररोज १६ कोटी टेलिफोन कॉल्स होतात; हिंदुस्थानांतहि टेलिफोनचा वापर हळूहळू वाढत आहे. तेव्हां हंसत मुखानें व गोड भाषेनें ऑपरेटर्सनीं कामें केलीं, तर त्याचा सामाजिक जीवनावर कितीतरी आल्हाद्कारक परिणाम होऊं शकेल !

---

### पाकिस्तानाकडे नोटा धाडणें हा गुन्हा आहे

पोस्टल पार्सलांतून चलनी नोटा पाकिस्तानांत पाठविण्यांत येत असल्याचें आढळून आलें आहे. अशा रीतीनें त्या पाठविणें गुन्हा असून त्यास २ वर्षें कारागृहवास व ५०० रु. दंड अशी शिक्षा आहे, असें भारत सरकारच्या पोस्ट-तार खात्यानें मुद्दाम जाहीर केलें आहे.

### अतिथि-अभ्यागतांवर खर्च

१० एप्रिल ते ३१ डिसेंबर १९४८ पर्यंत हिंदुस्थान सरकारच्या निरनिराळ्या खात्यांनीं अतिथि-अभ्यागतांसाठी ६,१२१ रु. १५ आ. खर्च केले. जानेवारी १९४९ ते जवळ जवळ डिसेंबर १९४९ अखेर ह्याच कामासाठीं रु. ९,७९४ रु. इतका खर्च झाला.

---

**पाकिस्तान-चेकोस्लोव्हाकिआमधील व्यापार**—पाकिस्तान आणि चेकोस्लोव्हाकिआ ह्या राष्ट्रांनीं एक व्यापारी करार केला आहे. कराराप्रमाणें पाकिस्ताननें चेक देशाला ताग, कापूस, सुकीं फळें, खेळाचें सामान इत्यादि माल पुरवावयाचा आहे. उलटपक्षीं, पाकिस्तान काढ्याच्या पेट्या, कापड, रसायनें, यांत्रिक नांगर, इत्यादि माल घेणार आहे. १९५० सालांत १०० कोटी क्राउन्स किंमतीच्या मालाची देवाणघेवाण करण्याचें ठरलें आहे.

**स्पेनमधील बेकारी**—स्पेनमधील बेकारांची संख्या सुमारें १,६०,२८९ असावी असा अंदाज प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या आकड्यांत शेतीमधील हंगामी बेकारांचा समावेश केलेला नाहीं. असे हंगामी बेकार स्पेनमध्यें लक्षावधि असतात. बेकारांना सरकारी भत्ता मिळत नाहीं. परंतु मजुरांच्या संघटना आणि स्थानिक स्वराज्य संस्था त्यांना मदत करतात. सार्वजनिक उपयोगाचीं कामें काढून बेकारी दूर करण्याकडे स्पेनच्या सरकारचा कल दिसून येतो.

**इगतपुरी तालुक्यांतील भाताची वसुली**—इगतपुरी तालुक्यांतील घोटी ह्या सरकारी अन्नधान्याच्या गुदामांत ११,००० पोतीं भात शेतकऱ्यांनीं भरलें. हें धान्य २,४०० सजविलेल्या बैलगाड्यांतून वाजतगाजत घोटीला आणण्यांत आलें.

---


**दि होप कंपनी लि.**

९१७ सदाशिव, पुणें २.

साबण कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

**मोठ्या ठेवीदारांस विशेष सवलत व भागीदारी.**

ठेवीचे दर

३ वर्षें ५% ५ वर्षें ६%

*अधिक चौकशीसाठीं समक्ष भेटावें.*

एस. बी. जोगळेकर

मॅ. डायरेक्टर.

## कुंभी धरण योजनेसाठी शेतकऱ्यांची तांतडीची हांक

( लेः—श्री. ए. बी. पाटील, मेंबर सामुदायिक शेती, सरवडे )

कोल्हापूर संस्थान विलीन होण्यापुर्वी अज्ञान कारकीर्दीत कुंभी, भोगावती आणि कासारी या नद्यांच्या दगडी धरणांकरितां कोणकोणत्या जागा विशेषतः बहुसंख्य शेतकऱ्यांना उपयोगी पडेल याची पाहणी मुंबई इलाख्याचे तज्ज्ञ इंजिनियर यांच्या नजरेखालीं होऊन त्यांनीं कुंभी नदीस सांगरुळ येथें खडेगौंड नांवाची जागा पसंत केली. त्यास आज सहा सात वर्षें होत आहेत. या ठिकाणीं पक्कें धरण झालें असतां सांगरुळ, कोपार्डे, आडूर, कळंबे, भामटे, चिंचवडे, मरळी, कळे, आसगांव, मल्हारपेट, सावर्डे, मोऱ्याची वाडी इत्यादि गांवचे शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होऊन दरसाल मातीचीं धरणें घालण्याकरितां जो अनाठाई पैसा जातो व कित्येक वेळीं धरण फुटून जाऊन लाखो रुपयांचे पेचांत ( नुकसानींत ) शेतकरी येतात, तो प्रसंग न यावा यासाठी त्या भागांतील विशेषतः सांगरुळ गांवचे प्रतिष्ठित शेतकऱ्यांनीं सहकारी तत्त्वावर या धरण योजनेकरितां ५१ हजार रुपयांचें शेअर भांडवल जमा केलें आहे. बाकी लागणारी रक्कम सरकारकडून लोन म्हणून घेऊन स्वावलंबनानें धरण पुरें करण्याची त्यांची इच्छा आहे. तरी त्यांना सरकारनें योग्य मार्गदर्शन आठ—पंधरा दिवसांत तातडीनें करून कामास सुरवात करावयास पाहिजे. चार दोन वर्षांत एकादे वर्षी मातीचें धरण फुटण्यांत येतें, त्यांतीलच पाळी दुर्दैवानें त्यांचेवर सध्या चालू सालीं धरण फुटून आलेली आहे. त्यामुळें पक्कें धरण बांधण्याची जागा उघडी आहे. तेव्हां धरण योजना हातीं घेण्याची हीच वेळ आली आहे. पावसाळा सुरू होण्यास अजून पांच सहा महिने लागतील. त्याचे आंत धरण बांधण्यांत यावें असें त्या भागांतील शेतकऱ्यांना मनापासून वाटत आहे.

योजना चांगल्या कोणत्याहि असतात पण त्या वेळींच व्हावयास पाहिजेत. जनतेच्या उत्साहाचा फायदा घ्यावयास पाहिजे. या धरण योजनेनें अधिक धान्य पिकविण्यास व उसाचे पिकास सात आठ हजार एकरपर्यंत मदत होणार आहे. आज मध्यवर्ती सरकार ज्या ध्येयानें प्रेरित होऊन अन्नधान्याच्या दृष्टीनें स्वंयपूर्ण व्हा म्हणत आहे, त्याला ही धरण योजना पोषकच आहे. म्हणून ही जनतेची हांक ज्या ऑफिसरांचेकडे जाईल त्यांनीं कामाची गती वाढवून एक महिन्याचे आंत कामास सुरुवात होईल असें करावें. सदर धरण सत्वर पुरें झालें म्हणजे इतर भागांतील शेतकरीहि आपण होऊन पुढें येऊन अशा प्रकारच्या सहकारी तत्त्वावर संघटना करून स्वतः स्वावलंबी होतील व देशाला अधिक धान्याच्या संकटांतून सोडवतील.

## महाराष्ट्रांतील बँकांचा संघः नियमांच्या मान्यतेसाठी सभा

महाराष्ट्रांतील बँकांची एक असोसिएशन स्थापन करण्यासाठी विचारविनिमय करण्याकरितां १७ नोव्हेंबर रोजीं पुणें येथें सभा भरली होती. सभेंत ठरल्याप्रमांणें असोसिएशनच्या नियमांचा खर्डा तयार करण्यांत आला आहे. त्यास मान्यता देण्यासाठीं आतां मंगळवार, ता. २४ जानेवारी रोजीं सायंकाळीं ५ वाजतां पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत सभा भरणार आहे. सभेचें अध्यक्षस्थान श्री. धों. कृ. साठे ( महाराष्ट्र बँक ) हे स्वीकारतील. बँकांच्या प्रतिनिधींनीं व डायरेक्टरांनीं सभेस उपस्थित रहावें, अशी निमंत्रिकांची [ श्री. धों. कृ. साठे ( महाराष्ट्र ), ग. रा. साठे ( प्रेसिडेन्सी ), मु. सि. लोहिया ( पूना ), बी. बी. वाल्वेकर ( भारत इं. ) आणि म. व्यं. शिंगरे ( भोर स्टेट ) ] विनंति आहे.

बेडेकर लोणचीं वापरा




स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

हें पत्र पुणें, पेट मांजर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

## कुंमी धरण योजनेसाठी शेतकऱ्यांची तांतडीची हांक

( लेः—श्री. प. बी. पाटील, मेंबर सामुदायिक शेती, सरवडे )


कोल्हापूर संस्थान विलीन होण्यापुर्वी अज्ञान कारकीर्दीत कुंभी, भोगावती आणि कासारी या नद्यांच्या दगडी धरणांकरितां कोण-कोणत्या जागा विशेषतः बहुसंख्य शेतकऱ्यांना उपयोगी पडेल याची पाहणी मुंबई इलाख्याचे तज्ज्ञ इंजिनियर यांच्या नजरेखालीं होऊन त्यांनीं कुंभी नदीस सांगरुळ येथें खडेगौंड नांवाची जागा पसंत केली. त्यास आज सहा सात वर्षें होत आहेत. या ठिकाणीं पक्कें धरण झालें असतां सांगरुळ, कोपार्डे, आडूर, कळंबे, भामटे, चिंचवडे, मरळी, कळे, आसगांव, मल्हारपेट, सावर्डे, मोऱ्याची वाडी इत्यादि गांवचे शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होऊन दरसाल मातीचीं धरणें घालण्याकरितां जो अनाठाई पैसा जातो व कित्येक वेळीं धरण फुटून जाऊन लाखो रुपयांचे पेचांत ( नुकसानींत ) शेतकरी येतात, ती प्रसंग न यावा यासाठी त्या भागांतील विशेषतः सांगरुळ गांवचे प्रतिष्ठित शेतकऱ्यांनीं सहकारी तत्त्वावर या धरण योजनेकरितां ५१ हजार रुपयांचें शेअर भांडवल जमा केलें आहे. बाकी लागणारी रकम सरकारकडून लोन म्हणून घेऊन स्वावलंबनानें धरण पुरें करण्याची त्यांची इच्छा आहे. तरी त्यांना सरकारनें योग्य मार्गदर्शन आठ—पंधरा दिवसांत तातडीनें करून कामास सुरवात करावयास पाहिजे. चार दोन वर्षांत एकादे वर्षी मातीचें धरण फुटण्यांत येतें, त्यांतीलच पाळी दुर्दैवानें त्यांचेवर सध्या चालू सालीं धरण फुटून आलेली आहे. त्यामुळें पक्कें धरण बांधण्याची जागा उघडी आहे. तेव्हां धरण योजना हातीं घेण्याची हीच वेळ आली आहे. पावसाळा सुरू होण्यास अजून पांच सहा महिने लागतील. त्याचे आंत धरण बांधण्यांत यावें असें त्या भागांतील शेतकऱ्यांना मनापासून वाटत आहे.

योजना चांगल्या कोणत्याहि असतात पण त्या वेळींच व्हावयास पाहिजेत. जनतेच्या उत्साहाचा फायदा घ्यावयास पाहिजे. या धरण योजनेनें अधिक धान्य पिकविण्यास व उसाचे पिकास सात आठ हजार एकरपर्यंत मदत होणार आहे. आज मध्यवर्ती सरकार ज्या ध्येयानें प्रेरित होऊन अन्नधान्याच्या दृष्टीनें स्वंयपूर्ण व्हा म्हणत आहे, त्याला ही धरण योजना पोषकच आहे. म्हणून ही जनतेची हांक ज्या ऑफिसरांचेकडे जाईल त्यांनीं कामाची गतां वाढवून एक महिन्याचे आंत कामास सुरुवात होईल असें करावें. सदर धरण सत्वर पुरें झालें म्हणजे इतर भागांतील शेतकरीहि आपण होऊन पुढें येऊन अशा प्रकारच्या सहकारी तत्त्वावर संघटना करून स्वतः स्वावलंबी होतील व देशाला अधिक धान्याच्या संकटांतून सोडवतील.

### महाराष्ट्रांतील बँकांचा संघः नियमांच्या मान्यतेसाठी सभा

महाराष्ट्रांतील बँकांची एक असोसिएशन स्थापन करण्यासाठी विचारविनिमय करण्याकरितां १७ नोव्हेंबर रोजीं पुणें येथें सभा भरली होती. सभेंत ठरल्याप्रमाणें असोसिएशनच्या नियमांचा खर्डा तयार करण्यांत आला आहे. त्यास मान्यता देण्यासाठी आतां मंगळवार, ता. २४ जानेवारी रोजीं सायंकाळीं ५ वाजतां पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत सभा भरणार आहे. सभेचें अध्यक्षस्थान श्री. धों. कृ. साठे ( महाराष्ट्र बँक ) हे स्वीकारतील. बँकांच्या प्रतिनिधींनीं व डायरेक्टरांनीं सभेस उपस्थित रहावें, अशी निमंत्रिकांची [ श्री. धों. कृ. साठे ( महाराष्ट्र ), ग. रा. साठे ( प्रेसिडेन्सी ), मु. सि. लोहिया ( पूना ), बी. बी. वाल्वेकर ( भारत इं. ) आणि म. व्यं. शिंगरे ( भोर स्टेट ) ] विनंति आहे.

बेडेकर लोणची वापरा




स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

हें पत्र पुणें, पेट मांपुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.